# विद्यार्थी अध्यात्मिक बुध्दिमत्ता विकासासाठी प्रशिक्षणार्थीमध्ये आवश्यक क्षमतांचा अभ्यास

प्रा.डॉ. महादेव सदाशिव डिसले
सहयोगी प्राध्यापक
शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी जि. सोलापूर

**सारांश (Abstract)**

*We are not human being having a spiritual experience; we are spiritual being having a human experience.*

*आपण अध्यात्मिक अनुभव प्राप्त मानवप्राणी नव्हे तर मानवी अनुभव प्राप्त अध्यात्मिक प्राणी आहे. (हेलकार्ड चार्डिन-फ्रेंच तत्त्वज्ञ)*

*अध्यात्मिक बुध्दिमत्त ही मूल्य आणि नैतिकतेशी संबंधित आहे. आजचा विद्यार्थी हा उदयाचा आदर्श, नितिमान नागरिक म्हणून घडवायचा असेल तर त्याच्यात अध्यात्मिक बुध्दिमत्ता विकासाठी प्रयत्न व्हायला हवेत. कारण उच्च अध्यात्मिक बुध्दिमत्ता प्राप्त व्यक्तीत फक्त शैक्षणिक नव्हे तर भावनिक विकासही उच्च दर्जाचा असतो. आजपर्यंत अनेक शिक्षक आयोगांनीसुध्दा मूल्य, नैतिक शिक्षणावर भर दिलेला आहे. विद्यापीठ शिक्षण आयोगाने तर विद्यापीठीय शिक्षणाची उद्दिष्ट्ये ठरविताना विद्यार्थी अध्यात्मिक विकास घडवून आणणे या उद्दिष्टालाही महत्त्वाचे स्थान दिले आहे.*

*मुख्य शब्द : अध्यात्मिक बुध्दिमत्ता, प्रशिक्षणार्थी, क्षमता विकास*

## प्रस्तावना

मानव, प्राणी, पक्षी यांचा विचार करता वस्त्र सोडले तर इतर मूलभूत गरजा जवळजवळ सारख्यांच असतात. पण प्राण्यांपेक्षा माणूस वेगळा ओळखला जातो तो म्हणजे त्याच्या बौध्दिक क्षमतेमुळे बुध्दिमत्ता व संप्रेषण कौशल्यामुळे माणसाने आपली उन्नती घडवून आणली आहे. पण फक्त भौतिक सुखाच्या पाठीमागे धावता धावता तो आज यंत्रवत बनू पाहत आहे या उलट एक आदर्श, नितिमान, नागरिक घडवायचे असतील तर मूल्य शिक्षण/नैतिक शिक्षणावर भर देणे गरजेचे आहे. आणि या मूल्यविकासाशी संबंधी बुध्दिमत्ता म्हणजेच अध्यात्मिक बुध्दिमत्ता होय.

शिक्षणाचे क्षेत्र खुपच व्यापक आहे. काही जणांनी यास द्विधृवात्मक तर काहीनी याला विधृवात्मक प्रक्रिया म्हटले आहे. यामध्ये विद्यार्थी व शिक्षकास महत्त्वाचे स्थान आहे. प्रस्तुत संशोधनामध्ये विद्यार्थी विकासासाठी शिक्षकांकडे आवश्यक गुणवैशिष्टयांच्या दृष्टीने अभ्यास केला आहे.

## 2) संशोधनाची उद्दिष्टे

1) अध्यात्मिक बुध्दिमत्ता विकासासाठी आवश्यक क्षमतांचा शोध घेणे.
2) प्रशिक्षणार्थीच्या अध्यात्मिक बुध्दिमत्तेच्या सद्य:स्थितीचा अभ्यास करणे.
3) प्रशिक्षणार्थीच्या अध्यात्मिक गुणांक बृध्दीसाठी शिफारशी करणे.

## अध्यात्मिक बुध्दिमत्ता

1990 मध्ये सर्वांत प्रथम न्यूरो मानसशास्त्रज्ञ पेसिन्जर आणि मज्जातंतू शास्त्रज्ञ रामचंद्रन यांनी बुध्दीतील ईश्वरीय कल्पना व अध्यात्मिकतेबद्दल मत मांडले.

अध्यात्मकशास्त्र अंतिमक सत्य शोधून काढण्याच्या दृष्टीने केलेले अनुभवांचे मंथन होय. यात सत्य काय आणि असत्य काय? हे शास्त्राच्या दृष्टीने पाहणे होय. तर अध्यात्मिक गुणांक म्हणजे व्यक्तीच्या जीवनातील मौलिकता आणि अर्थपूर्णता यांच्यात येणाऱ्या समस्या समजून घेणे. हे अध्यात्मिक बुध्दिमत्तेत समाविष्ट होते. (डॅना जोहर आणि इयान मार्शल, (2000) आनंद तेंडूलकर म्हणतात की, 'अध्यात्मिक गुणांक म्हणजे आयुष्यांतील ध्येय-धोरणांवर

विचार/चिंतन करणे होय' जेव्हा मी याबाबत विचार करतो तेव्हा मला असे जाणवते की, आयुष्यात खूप काही करण्यासारखे आहे यासाठी खुल्या मनाने मार्गक्रमण करतो, तेव्हा मी पूर्णत्त्वापर्यंत पोहोचलेला असतो.

**अध्यात्मिक बुद्धिमत्ता स्वरुप**

अध्यात्मिक बुद्धिमत्ता ही सामान्यपणे धर्मिकतेशी संबंधित संकल्पना वाअते पण अध्यात्मिक बुद्धिमत्ता व धार्मिकतेत खूप कमी संबंध आहे. एखाद्या नास्तिक व्यक्तीत उच्च अध्यात्मिक गुणांक असल्याचे आढळेल. तर एखाद्या धार्मिक व्यक्तीमध्ये अभाव असेल.

मग अध्यात्मिक बुद्धिमत्ता असणाऱ्या व्यक्तीकडे नेमकी कोणती गुणवैशिष्टये असावीत ती खालील प्रमाणे.

| | |
|---|---|
| 1) **सदाचारी**<br>2) **बांधीलकी** | 3) **दूरदृष्टी तसेच मर्मदृष्टी**<br>4) **देवत्त्व** |
| 5) **अनुकंपा/दया** | 6) लवचिकता |
| 7) **कृतज्ञता** | 8) पावित्र्य राखणे |
| 9) **अंत:स्फुरण** | 10) स्व:जाणीव |
| 11) **फाजील चौकस** | 12) एखाद्या धक्क्यातून पटकन सावरणे |
| 13) **सेवाभावी वृत्तीचे नेतृत्त्व** | 14) मूल्य |
| 15) **परंपरागत मार्गांच्या विरुध्द कार्य** | 16) आंतरिक शांतता व आनंददायी भावना |

**संशोधन कार्यवाही**

वरील मुद्दयानुसार निर्मित सिंघ आणि कौर यांची प्रमाणित चाचणी वापरुन माहिती संकलनासाठी संशोधकाने शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी मधील 20 प्रशिक्षणार्थीची निवड असंभाव्यतेवर आधारित सहेतूक नमुना निवड पध्दतीने केली.

प्राप्त माहिती निष्कर्ष खालील प्रमाणे.

| अध्यात्मिक बुद्धिमत्ता आवश्यक | गुणवैशिष्टये मध्यमान |
|---|---|
| **A सदाचारी** | 51.11 |
| **B दूरदृष्टी तसेच मर्मदृष्टी** | 54.44 |
| **C बांधीलकी** | 75.33 |
| **D देवत्त्व** | 64.81 |
| **E अनुकंपा/दया** | 49.16 |
| **F लवचिकता** | 41.65 |
| **G कृतज्ञता** | 71 |
| **H पावित्र्य राखणे** | 79.04 |
| **I अंत:स्फुरण** | 35.83 |
| **J स्व:जाणीव** | 62.33 |
| **K फाजील चौकस** | 74.44 |
| **L एखाद्या धक्क्यातून पटकन सावरणे** | 44.28 |
| **M सेवाभावी वृत्तीचे नेतृत्त्व** | 72.03 |
| **N मूल्य** | 60.66 |
| **O परंपरागत मार्गांच्या विरुध्द कार्य** | 43.77 |
| **P आंतरिक शांतता व आनंददायी भावना** | 61.66 |

**निष्कर्ष**

1) प्रशिक्षणार्थीमध्ये देवत्त्व, कृतज्ञता, स्व-जाणीव राखणे, चौकस वृत्ती व सेवाभावी वृत्तीचे नेतृत्त्व इ. उच्चप्रतीची गुणवैशिष्टये आढळली.
2) प्रशिक्षणार्थीमध्ये दया, लवचीकता, एखाद्या धक्कयातून पटकन सावरणे, परंपरागत मार्गाच्या विरुध्द कार्य करणे इ. गुणवैशिष्टये कमी प्रमाणात आढळली.
3) प्रशिक्षणार्थीमध्ये पावित्र्य राखणे, सेवाभावी वृत्तीचे नेतृत्व, कृतज्ञता, बांधिलकी यामध्ये सर्वाधिक गुणवैशिष्टये आढळून आली.
4) विविध मूल्य रुजवणूकीसाठी अध्यात्मिक बुध्दिमत्ता ही संकल्पना परिणामककारक आहे असे दिसून येते.

**शिफारशी**

1) अध्यात्मिक बुध्दिमत्ता विकासासाठी प्रशिक्षणार्थीसाठी विविध शैक्षणिक साधनांची व उपक्रमांची निर्मिती करावी.
2) अध्यात्मिक बुध्दिमत्ता विकासासाठी वार्षिक नियोजनामध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करावे.

**समारोप**

सध्याच्या जागतिकीकरणाच्या युगात प्रत्येक व्यक्तीला काहीही करुन पुढे जायचे आहे. कमी वेळ व कमी श्रमात जास्त लाभ घेण्याकडे सर्वांची वृत्ती कलत आहे.

यामुळेच सर्वत्र भ्रष्टाचारासारखी समस्या तसेच परस्पर अविश्वासाची भावना दिसून येते.

अशा परिस्थितीत विश्वबंधुत्त्व, परस्पर दयाभाव या आणि इतरही नैतिक मूल्यांची रुजवणूक होणे गरजेचे आहे. यासाठी शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीबरोबरच अध्यात्मिक बुध्दिमत्ता विकासावरही भर दिला पाहिजे.

यामुळे आपल्या भारतीय संस्कृतीतील अध्यात्माचा पाया व दातृत्त्वाची शिकवणही मुलांपर्यंत पोहचेल या दृष्टीने शिक्षकांकडे गुणवैशिष्टयांचा विचार प्रस्तुत अभ्यासात केला आहे.

## संदर्भसूची

1) करंदीकर, सुरेश (2009, अध्ययन-अध्यापनाचे मानसशास्त्र कोल्हापूर, फडके प्रकाशन.
2) कळके, शिरगांव व शेंडगे (2006), अध्यायनार्थीचे मानसशास्त्र आणि अध्यापन प्रक्रिया कोल्हापूर, फडके प्रकाशन.
3) बन्सी बिहारी पंडित (1997), शिक्षणातील संशोधन पुणे, नूतन प्रकाशन.
4) बोरुडे रा.र. (2005), प्रथमवृत्ती, संशोधन पध्दतीशास्त्र प्रकाशक, हणमंत भोसले
5) जगताप ह. ना. (2000), प्रगत शैक्षणिक मानसशास्त्र पुणे, नुतन प्रकाशन.
6) जोशी अनंत, कार्डिल वसंतराव, वर्तक चंद्रकांत व महाले संजीवनी, मे (2012), शैक्षणिक व समाजशास्त्रीय संशोधन.
7) Best, J.W. and khan James V.(2010), Research in Education, New Delhi: PHI Publication.
8) Htpp://www.google.co.in
http://wikipedia.org/wiki/spiritual quotiet.